विशेष शाखा,पोलीस आयुक्त कार्यालय सोलापूर शहर
नविन प्रशासकीय इमारत, गांधीनगर, सोलापूर
दुरध्वनी क्र. - ०२१७-२७४४६०५ Email ID :-. pisb.cpsol@mahapolice.gov.in

**महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (३) आदेश**

जा.क्रं.विशा/प्रसिध्दी/ ८९४ /२०२५ सोलापूर शहर, दिनांक :-२७/०२/२०२५

--- ००० ---

ज्या अर्थी, सोलापूर शहर हे महाराष्ट्रातील सर्वात मोठ्या प्रमाणावर धार्मिक सण, उत्सव, जयंती, पुण्यतिथी साजरे करणारे शहर आहे. शहरात आगामी काळात रमजान रोजे प्रारंभ, होळी, धुलिवंदन उत्सव, सावित्रीबाई फुले पुण्यदिन, छत्रपती संभाजीराजे बलिदान दिन असे कार्यक्रम संपन्न होणार आहेत. तसेच इयत्ता १२ वी आणि १० वी शालांत व माध्यमीक बोर्ड परिक्षा यासह मराठा, ओबीसी व धनगर आरक्षण वगैरेच्या माध्यमातून कायदा व सुव्यवस्थेस बाधा होण्याची दाट शक्यता आहे. त्याकरीता महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (३) अन्वये प्रतिबंधात्मक आदेश जारी करणे आवश्यक आहे अशी माझी खात्री झाली आहे.

त्या अर्थी, मी डॉ. दीपाली काळे, पोलीस उप-आयुक्त (गुन्हे/विशा), सोलापूर शहर, मला महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ मधील ३७ (३) अन्वये असलेल्या अधिकारास अनुसरुन सोलापूर शहर पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत सार्वजनिक ठिकाणी **दिनांक २८/०२/२०२५ रोजी ००:०१ वाजले पासून ते दिनांक १४/०३/२०२५ रोजीचे मध्यरात्री २४:०० वाजेपर्यत** मिरवणुका काढण्यास, सभा घेण्यास, ५ किंवा ५ पेक्षा अधिक लोकांना एकत्र येण्यास मनाई राहील असा आदेश देत आहे.

हा आदेश लग्न, अंत्ययात्रा इत्यादी. लागू असणार नाही. तसेच मिरवणूका, मोर्चा, रॅली, आंदोलने, निवेदने, धरणे, सभा इ.ना सक्षम पोलीस प्राधिकरणाची पूर्वपरवानगी घेऊन केला असेल, त्यांना लागू होणार नाही.

हा आदेश **दिनांक २८/०२/२०२५ रोजी ००:०१ वाजले पासून ते दिनांक १४/०३/२०२५ रोजीचे मध्यरात्री २४:०० वाजेपर्यंत** पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत अंमलात राहील.

सदरचा आदेश हा माझ्या सही व शिक्यानिशी दिला आहे

पोलीस उप-आयुक्त विशा / गुन्हे शाखा सत्यमेव जयते सोलापूर शहर

**स्थळ : सोलापूर शहर**
**दिनांक : २७/०२/२०२५**

( डॉ. दीपाली काळे )
**पोलीस उप आयुक्त, (गुन्हे/विशा)**
**सोलापूर शहर.**

प्रति,

०१. वपोनि फौजदार चावडी/जेल रोड/एमआयडीसी/जोडभावी पेठ/सदर बझार/ विजापूर नाका/सलगरवस्ती पोलीस ठाणे.
०२. सहाय्यक पोलीस आयुक्त, विभाग -१ / विभाग-२ / नियंत्रण कक्ष, सोलापूर.
०३. पोलीस उप-आयुक्त, (मुख्यालय), (परिमंडळ), (गुन्हे/विशा), सोलापूर
०४. जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी, सोलापूर यांना प्रसिध्दी करीता सस्नेह अग्रेषीत
०५. प्रभारी अधिकारी, माहिती कक्ष, पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर.

२/- **सदरचा आदेश हा सर्व दैनिक/स्थानिक वृत्तवाहिनीवर प्रसिध्दीस द्यावा.**